मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मालमत्ता करातून महापालिका मालामाल

## शेवटच्या तीन दिवसांत 90 कोटी वसूल करण्याचे आव्हान : 910 कोटी तिजोरीत

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका तिजोरीत मालमत्ता करातून ९१० कोटी रुपये जमा झाले आहेत. एक हजार कोटी रुपयांचे उदिष्ट पूर्ण करण्यासाठी शेवटच्या तीन दिवसांत ९० कोटी वसूल करण्याचे आव्हान कर संकलन विभागापुढे असणार आहे. शुक्रवार, शनिवार आणि रविवार सकाळी साडेनऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत कर संकलन कार्यालये खुली राहणार आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात मालमत्ताधारकांना कर भरण्यासाठी १७ विभागीय कार्यालये आणि ऑनलाइनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आत्तापर्यंत ९१० कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. एक हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, नळजोड खंडित करणे, जप्त मालमत्तांचा लिलाव यासारख्या कारवाया केल्या जात आहेत. आज (२९ मार्च) शुक्रवारी गुड फ्रायडे आणि शनिवार, रविवार महापालिकेला शासकीय सुट्टी आहे. मात्र, या तिन्ही दिवशी नागरिकांच्या सोयीसाठी कर संकलन कार्यालये सकाळी साडेनऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत खुली राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांना कराचा भरणा करता येणार असल्याची माहिती सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली.




### ऑनलाइन कर भरणा वाढला

आत्तापर्यंत औद्योगिक चार हजार ३९५, निवासी चार लाख २६ हजार ५३०, बिगरनिवासी ४४ हजार ५५४, मिश्र १२ हजार ४३२, मोकळ्या जमिनी ४ हजार ४१६ अशा चार लाख ९२ हजार ४२२ जणांनी कराचा भरणा केला आहे. ऑनलाइन ५१३ कोटी ५८ लाख, रोखीत १३१ कोटी २४ लाख, धनादेशाद्वारे १४७ कोटी १७ लाख, इडीसी १२ कोटी ९३ लाख, आरटीजीएस ४३ कोटी २० लाख, धनाकर्ष (डिमांड ड्रॉफ्ट) आठ कोटी १२ लाख, विविध उपयोजन सहा कोटी ९३ लाख आणि इनइफ्टीद्वारे सहा कोटी ८३ लाख रुपये जमा झाले आहेत.

### वाकड विभागात सर्वाधिक कर भरणाऱ्यांची संख्या

शहरात कर संकलनासाठी महापालिकेचे १७ विभागीय कार्यालये आहेत. यामध्ये वाकड विभागात सर्वाधिक म्हणजे ६५ हजार मालमत्ताधारकांनी १४८ कोटी रुपयांचा कर जमा केला आहे. त्याखालोखाल सांगवी, चिखली, चिंचवड, मोशी, भोसरी विभागात कराचा भरणा झाला आहे. तर, सर्वात कमी तळवडे विभागात आठ हजार ९६ मालमत्ताधारकांनी २३ कोटी ३८ लाखांचा कर भरणा केला आहे.

---

# उमेदवारी घोषित होताच श्रीरंग बारणेंची 'डरकाळी'

## खासदार बारणेंना तिसऱ्यांदा उमेदवारी : मावळमध्ये दोन्ही शिवसेनेतच लढत!

**पिंपरी| प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी त्यांची उमेदवारी जाहीर करताच कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला आहे. महायुतीने मावळ लोकसभेत श्रीरंग बारणे यांना पुन्हा एकदा मैदानात उतरवलं आहे. आता बारणेंचा सामना महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्यासोबत होणार आहे. उमेदवारी जाहीर होताच मी हॅट्रिक मारणार, असा दावा श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला आहे.

श्रीरंग बारणे म्हणाले की, ही निवडणूक विकासात्मक निवडणूक आहे. देशामध्ये नरेंद्र मोदी यांनी जनतेचा विश्वास मिळवलेला आहे. तसेच गेल्या १८ महिन्यांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी जनतेच्या मनात विश्वास निर्माण केलेला आहे. आणि मावळ लोकसभा मतदार संघात केलेल्या कामाच्या जीवावर जनता ही माझ्यासोबतच राहील असा विश्वास त्यांनी शेवटी बोलताना व्यक्त केला आहे.

श्रीरंग बारणे म्हणाले की, शिवसेना पक्षाचे नेते एकनाथ शिंदे, भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांनी माझ्यावर विश्वास टाकत पुन्हा मला उमेदवारी दिली आहे, त्याबद्दल मी त्यांचा मनस्वी आभारी आहे. कामाच्याद्वारे लोकसंपर्काच्याद्वारे या निवडणुकीला सामोरे जात असताना येणाऱ्या निवडणुकीत शंभर टक्के माझा विजय होईल असा एवढा मला आत्मविश्वास वाटतो आहे.



खासदार बारणे सलग तिसऱ्यावेळी निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यांनी २०१४ मध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या चिन्हावर आणि मनसेच्या पाठिंब्याने लढलेले भाजपचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचा पराभव केला होता. तर, २०१९ मध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ यांचा पराभव केला होता. आता त्यांच्यासमोर महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाच्या संजोग वाघेरे यांचे आव्हान असणार आहे.

# पुण्यात नवे राजकीय समीकरण

## वसंत मोरे यांनी घेतली वंचित आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची भेट

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात लोकसभा निवडणुकीत यावेळी अनेक ठिकाणी चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. त्यात पुण्याचा अग्रक्रम आहे. पुण्यात वसंत मोरे यांच्या खेळीने कोणाची समीकरणं बिघडतात. कोणत्या पक्षाला मनसेतील हे बंड डोकेदुखी ठरते हे येत्या दोन-तीन महिन्यात समोर येईल. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अखेरचा रामराम केल्यानंतर वसंत मोरे काय भूमिका घेतात याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते.

पुणे लोकसभा लढविण्यासाठी मनसेतून बाहेर पडलेल्या वसंत मोरे यांनी आज वंचित आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. पुणे लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या वसंत मोरेंनी काही दिवसांपूर्वीच मनसेला राम राम ठोकला. महाविकास आघाडीच्या कोट्यातून मोरेंना पुणे लोकसभेची जागा मिळू शकते, असा अंदाज वर्तविण्यात येत होता. पण कॉंग्रेसकडे पुणे लोकसभा मतदारसंघ असून त्यांनी विद्यमान आमदार रवींद्र धंगेकर यांना पुण्यातून उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे वसंत मोरे पुढे काय करणार? असा प्रश्न उपस्थित झाला होता.

पुणे लोकसभा निवडणूक एकतर्फी होऊ देणार नाही, असे स्टेटस वसंत मोरेंनी काही दिवसांपूर्वीच सोशल मीडियावर टाकले होते. त्याप्रमाणे त्यांनी आता पुणे लोकसभेसाठी मित्र पक्षांची जुळवाजुळव करण्यास सुरुवात केली असून आज त्यांनी वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली.

प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीशी काडीमोड घेत राज्यातील काही लोकसभा मतदार संघात उमेदवारांची घोषणा केली. आंबेडकर स्वतः अकोला मतदार संघातून निवडणूक लढवत आहेत. प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेऊन वंचित बहुजन आघाडी आणि मराठा आंदोलक यांची मोट बांधण्याचा प्रयत्न केला आहे. आता या प्रयोगावर राज्यात उलटसुलट चर्चा आहे.



> “मी शंभर टक्के पुणे लोकसभेची निवडणूक लढणार आहे. मी माझं नशीब समजतो की, वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकरांनी मला इथं बोलावलं. मला त्यांनी पुरेसा वेळ दिला, त्यातून आमची अतिशय चांगली चर्चा झाली. पुण्यातील मतदान चौथ्या टप्प्यात होणार आहे, त्यामुळे आमच्याकडे खूप वेळ आहे. पुढील काही दिवसांत कोणता मार्ग स्वीकारायचा याबाबत निर्णय घेऊ. पुणे लोकसभेसाठी वंचितचा उमेदवार द्यायचा की नाही याचा निर्णय प्रकाश आंबेडकर घेतील”.
>
> **- वसंत मोरे**

### महाराष्ट्रात नवे राजकीय समीकरण दिसेल

वसंत मोरे यांच्या भेटीबाबत बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, “वसंत मोरे यांच्याबरोबर आमची चर्चा आज झाली. अधिकृत निर्णय ३१ मार्च पर्यंत आम्ही जाहीर करू. महाराष्ट्रात नव्या राजकारणाची सुरुवात कशी होईल, ती कोण कोण करणार आहे. हे अधिकृतरित्या काही दिवसांतच सर्वांसमोर मांडू. काही चर्चा आताच जाहीर करू शकत नाही.”

### प्रकाश आंबेडकर यांचा एकला चलो रे

प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीशी काडीमोड घेत राज्यातील काही लोकसभा मतदार संघात उमेदवारांची घोषणा केली. आंबेडकर स्वतः अकोला मतदार संघातून निवडणूक लढवत आहेत. प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेऊन वंचित बहुजन आघाडी आणि मराठा आंदोलक यांची मोट बांधण्याचा प्रयत्न केला आहे. आता या प्रयोगावर राज्यात उलटसुलट चर्चा आहे.

# सेवा विकास बँक फसवणूक

## अऱ्हानासह एक ताब्यात; CID ची कारवाई




**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील सेवा विकास बँकेच्या कर्ज फसवणूक प्रकरणी गुरुवारी (28 मार्च) सीआयडी अधिकाऱ्यांनी रोजरी एज्युकेशन ग्रुपचे विनय अऱ्हाना आणि सागर सूर्यवंशी यांना अटक केली आहे. सीआयडीने त्यांना अंमलबजावणी सक्त वसुली संचलनालयाकडून ताब्यात घेतले आहे. त्यानंतर या दोघांनाही रात्री साडेबारा वाजेच्या सुमारास विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने या दोघांनाही पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पुण्याच्या शिवाजी नगर न्यायालयात ही सुनावणी पार पडली. तर शिवाजी नगर न्यायालयाच्या इतिहासात प्रथमच अशाप्रकरे सत्र न्यायाधीशांनी रात्री 12.30 वाजता सुनावणी घेतली. यापूर्वी पंजाबी गायक सिध्दू मुसेवाला प्रकरणात रात्री 11 वाजता पुणे ग्रामीण पोलिसांनी आरोपींना कोर्टात हजर केले होते.

गेल्या वर्षी बेकायदेशीर रित्या शेकडो कोटींचं कर्ज दिल्या प्रकरणी पिंपरी चिंचवड या भागातील द सेवा विकास सहकारी बँकेचा माजी संचालक अमर मुलचंदाणीच्या घरावर आणि कार्यालयावर ईडीने छापेमारी केली होती

# निवडणुकीसाठी 47 हजार कर्मचाऱ्यांची नेमणूक

## निवडणुकीसाठी येत्या 1 एप्रिलपासून कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानासाठी प्रशासनाने आतापासूनच आवश्यक तयारी सुरू केली असून निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे सूक्ष्म नियोजनावर भर देण्यात येत आहे. आयोगाच्या निर्देशानुसार मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी ४७ हजारापेक्षा अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांना १ एप्रिलपासून प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

मतदानासाठी नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांना संपूर्ण प्रक्रियेची माहिती व्हावी यासाठी सविस्तर प्रशिक्षण सत्र आयोजित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी दिले आहेत. कर्मचाऱ्यांना ईव्हीएमच्या प्रात्यक्षिकासह नियमांची माहिती प्रशिक्षणाद्वारे देण्यासाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेची नियमावली, घ्यावयाची खबरदारी, ईव्हीएम हाताळण्याची पद्धत याविषयी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.



मतदानासाठी पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्या मार्गदर्शनाखाली मनुष्यबळाचे नियोजन करण्यात येत आहे. जिल्ह्यातील चार लोकसभा मतदारसंघात मतदानासाठी एकूण ४७ हजार ३५९ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील एकूण ८ हजार ३८२ मतदान केंद्रावर प्रत्येकी ४ याप्रमाणे ३३ हजार ५२८ मतदान कर्मचारी असतील. यापैकी मावळ लोकसभा मतदारसंघातील जिल्ह्यात येणाऱ्या ३ विधानसभा मतदारसंघात १ हजार ३३९ मतदान केंद्रांसाठी ५ हजार ३५६, पुणे २ हजार १८ मतदान केंद्रासाठी ८ हजार ७२, बारामती २ हजार ५१६ मतदान केंद्रासाठी १० हजार ६४ आणि शिरुर लोकसभा मतदारसंघातील २ हजार ५०९ मतदान केंद्रासाठी १० हजार ३६ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

मावळसाठी १ हजार ६०७, पुणे २ हजार ४२२, बारामती ३ हजार १९ आणि शिरुर लोकसभा मतदारसंघासाठी ३ हजार ११ याप्रमाणे प्रत्येकी ३० टक्के अतिरिक्त मनुष्यबळाचेही प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. त्याशिवाय चारही मतदारसंघ मिळून ३ हजार ७७३ कर्मचाऱ्यांनाही प्रशिक्षण देण्यात येईल..

### नियमांचे कटाक्षाने पालन ...

» एकूण मनुष्यबळापैकी सुमारे ४० टक्के महिला कर्मचारी असून त्यांच्यासाठी आवश्यक सुविधा मतदान केंद्रावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सर्व कर्मचाऱ्यांचे लोकसभा मतदारसंघ स्तरावर याद्दच्छीकीकरण करून त्यांना मतदान केंद्रावर नेमण्यात येईल. सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणादरम्यान मतदान प्रक्रियेची नीट माहिती करून द्यावी आणि निवडणूक नियमांचे कटाक्षाने पालन होईल याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ.दिवसे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# अजित पवारांनी डावललं, विलास लांडे नाराज

## अजित पवारांनी शिरूर लोकसभेत डावललं : शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार?

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिरूर लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव-पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घेऊन अधिकृत उमेदवारी दिल्याने नाराज झालेले भोसरीचे माजी आमदार विलास लांडे हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाणार असल्याची चर्चा आहे. त्यातच अनेकांना शरद पवार गटात आणण्यासाठी प्रयत्न करणारे शिरुरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनीही सूचक विधान केले आहे.

विलास लांडे यांनी २००९ मध्ये लोकसभेची निवडणूक लढविली होती. २०१९ मध्येही त्यांनी जोरदार तयारी केली. परंतु, ऐनवेळी शिवसेनेतून आलेल्या डॉ. अमोल कोल्हे यांना राष्ट्रवादीची उमेदवारी मिळाल्याने त्यांची संधी हुकली होती. राष्ट्रवादीची दोन शकले झाल्यानंतर त्यांनी अजित पवार यांच्यासोबत राहणे पसंत केले. महायुतीत शिरुर मतदारसंघ राष्ट्रवादीला मिळणार असल्याचे निश्चित झाल्याने लांडे यांनी पुन्हा लोकसभेची उमेदवारी मागितली. मला लोकसभेची उमेदवारी देत नसाल तर आयात उमेदवार देऊ नका, असे म्हणत आढळराव यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. पण, त्यांचा विरोध नाकारुन आढळराव-पाटील यांना राष्ट्रवादीत घेऊन उमेदवारी जाहीर केली आहे.

आढळराव-पाटील यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून लांडे शांत आहेत. कोणतेही भाष्य करताना दिसत नाहीत. त्यामुळे लांडे हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. याबाबत भोसरी मतदारसंघात प्रचारासाठी आलेले खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना विचारले असता ते म्हणाले, की श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालणारा मी मावळा आहे. महाराजांची शिकवण आहे की मोहीम फत्ते झाल्यानंतर निकाल दिसला पाहिजे, मोहिमेची वाच्यता नको, असे म्हणत त्यांनी लांडे हे संपर्कात असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. त्यामुळे लांडे हे शरद पवार यांच्या पक्षात जातात का याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी भोसरी मतदारसंघातील नागरिकांच्या गाठीभेटी घेत प्रचाराला सुरुवात केली. पत्रकारांशी बोलताना डॉ. कोल्हे म्हणाले की, नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. मागीलवेळी भोसरीतून शिवाजीराव आढळराव यांना मताधिक्य मिळाले होते ते कमी करण्यासाठी भोसरीत मतदारसंघ पिंजून काढत आहात का असे विचारले असता, त्यावर डॉ. कोल्हे म्हणाले मी शेतक-याचा मुलगा आहे.

त्यामुळे आज पेरले आणि आजच कापायला आले असे होत नाही. पाच वर्षे भोसरी विधानसभा मतदारसंघातील प्रश्नांवर आवाज उठविला. पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी असो, रेडझोनचा प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने जनसंपर्क सुरु आहे. मी गेल्यावेळीही शरद पवार यांच्या पक्षाकडून आणि आजही त्यांच्याच पक्षाकडून निवडणूक लढवत आहे. गेल्यावेळी समोरचे चित्र, चिन्ह वेगळे होते. समोरचा पक्ष वेगळा होता. आता स्वार्थासाठी पक्षामध्ये जो बदल झाला आहे ही जनता बघत आहे.

### शरद पवार गटात आणण्यासाठी पुढाकार...

अनेकांना शरद पवार गटात आणण्यासाठी तुम्ही पुढाकार घेत आहात. माजी आमदार विलास लांडे नाराज आहेत. त्यांच्याशी काही संपर्क साधला आहे का असे विचारले असता डॉ. कोल्हे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालणारा मी मावळा आहे. महाराजांची शिकवण आहे मोहिम फत्ते झाल्यानंतर निकाल दिसला पाहिजे, मोहिमेची वाच्यता नको. भोसरीचे माजी आमदार विलास लांडे नाराज असल्याची चर्चा असतानाच याबाबतच्या प्रश्नावर शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी सूचक विधान केले आहे.

# सलग सुट्ट्यांमुळे द्रुतगती मार्गावर कोंडी

## सलग सुट्ट्यांमुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर कोंडी : घाट क्षेत्रात वाहतूक संथ

**पिंपरी | प्रतिनिधी**

गुड फ्रायडेला जोडून आलेल्या सलग सुट्ट्यांमुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर शुक्रवारी कोंडी झाली. घाट क्षेत्रात वाहतूक संथ झाल्याने वाहनांच्या रांगा लागल्या. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी खंडाळा आणि बोरघाट महामार्ग पोलिसांनी प्रयत्न केले.

दहावी आणि बारावीची परीक्षा संपल्या आहेत. गुड फ्रायडेला जोडून शनिवार आणि रविवारची सुट्टी आल्याने मुंबईतील पर्यटक मोठ्या संख्येने सहकुटुंब फिरायला बाहेर पडले. खंडाळा घाटात शुक्रवारी सकाळपासून वाहतूक ठिकठिकाणी विस्कळीत झाली. वाहतूक संथ झाल्याने वाहनांच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी खंडाळा महामार्ग पोलीस आणि बोरघाट महामार्ग पोलिसांनी उपाययोजना केल्या.

पुण्याकडे जाणाऱ्या मार्गिकेवर कोंडी झाल्याने मुंबईकडे जाणारी वाहतूक थांबविली. त्यानंतर सर्व मार्गिका पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांना सर्व मार्गिकांवरुन सोडण्यात आली. पुण्याकडे जाण्यासाठी मार्गिका उपलब्ध झाल्याने घाट क्षेत्रातील वाहतूक दुपारनंतर सुरळीत झाली. गेल्या आठवड्यापासून उन्हाळा वाढल्याने लोणावळा, पवनानगर, महाबळेश्वर, पाचगणीकडे जाणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली आहे. शुक्रवारी सकाळपासून खंडाळा आणि लोणावळा परिसरात मोठ्या संख्येने पर्यटकांची वाहने दाखल झाली. लोणावळा शहरात वाहतूक कोंडी झाली.

लोणावळा-खंडाळ्यातील हॉटेल्स व रिसॉर्ट हाउसफुल्ल झाले आहेत. जोडून आलेल्या सलग सुट्यांमुळे लोणावळा परिसरात पर्यटकांची मोठी गर्दी आहे. पर्यटकांच्या प्रचंड गर्दीमुळे पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर बोरघाटात सलग दुसऱ्या दिवशी पर्यटकांना वाहनकोंडीस सामोरे जावे लागले.



### द्रुतगतीवर वाहतुकीची पुन्हा कोंडी...

पर्यटकांच्या वाहनांमुळे बोरघाटात द्रुतगती मार्गावरील वाहतूक कासवगतीने सुरू होती. पर्यटक मोठ्या संख्येने बाहेर पडल्याचे चित्र होते. पुण्याच्या दिशेने येणाऱ्या वाहनांच्या रांगा जवळपास दोन ते तीन किलोमीटर अंतरापर्यंत लागल्याचे पहावयास मिळाले. मुंबई-पुणे लेनवर वाहतूक अमृतांजन पूल अंडा पॉइंट, दस्तुरीच्याही पुढे गेली. पर्यटनासाठी बाहेर पडलेल्या पर्यटकांना बोरघाटात वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागल्याने मनस्ताप सहन करावा लागला. वाहतुकीवर ताण आल्याने वाहतूक सुरळीत करताना कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाली..

लोणावळा व खंडाळा ही ठिकाणे पर्यटकांच्या आकर्षणाची केंद्रे आहे. लोणावळा परिसरातील भुशी धरण, राजमाची, लोहगड, एकवीरा-भाजेलेणी परिसर, पवना धरण परिसरात सर्व मोसमामध्ये पर्यटक गर्दी करीत असतात. सर्वाधिक पसंती ठिकाण असलेल्या लायन्स पॉइंट, खंडाळ्यातील राजमाची उद्यान, सनसेट पॉइंट येथेही पर्यटकांची पसंती मिळते. पावसाळ्यात वर्षाविहारासाठी पर्यटकांना अक्षरशः वेड लागते.

सलग सुट्या आल्याने पर्यटकांचा ओघ सुरू झाला आहे. अनेकांनी लोणावळ्यासह महाबळेश्वर, माथेरानसह लोणावळा-खंडाळ्याचा बेत आखला आहे. अनेकांनी हॉटेल्स व रिसॉर्ट आरक्षित केले आहे. पर्यटकांची वर्दळ सुरू झाल्याने व्यावसायिकांमध्ये चैतन्य पसरले आहे.

# एक-दोन गुंठे जमिनीची खरेदी-विक्री होणार

## तुकडेबंदी कायद्यात सुधारणा : चार कारणांसाठी जमिनीचा गुंठ्यांमध्ये व्यवहार करता येणार

**पुणे | प्रतिनिधी**

तुकडेबंदी कायद्यात अखेर राज्य सरकारने शिथिलता आणली आहे. चार कारणांसाठी एक-दोन गुंठे जमिनींची खरेदी-विक्री करता येणार आहे. राज्य सरकारने ५ मे २०२२ रोजी राजपत्र प्रसिद्ध केले होते. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांतील जिरायत जमिनीसाठी २० गुंठे, बारामती जमिनीसाठी दहा गुंठे प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आले. म्हणजेच या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी जमीन खरेदी-विक्री होणार नाही.

काही शेतकऱ्यांना रस्ते, विहीर आदी कारणांसाठी एक-दोन गुंठ्यातील जमीन खरेदी-विक्री करावी लागते. त्यामुळे शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊन राज्य सरकारने तुकडेबंदी कायद्यात सुधारणा केली आहे. कायद्यात सुधारणा करण्याबाबतचे प्रारूप राज्य सरकारने १४ जुलै २०२३ रोजी जाहीर केले होते. या प्रारूपावर मागविण्यात आलेल्या हरकती, सूचना निकाली काढून प्रारूप अंतीम करण्याचे राजपत्र १४ मार्च रोजी प्रसिद्ध करण्यात आले.

विहीर, शेतरस्ता, सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन केल्यानंतर किंवा थेट खरेदी केल्यानंतर प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असलेल्या शिल्लक जमिनीसाठी आणि केंद्र किंवा राज्य सरकारच्या ग्रामीण घरकूल योजनेच्या प्रयोजनासाठी तुकड्यातील जमिनींचा व्यवहार करता येणार आहे. मात्र, याकरिता जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करावा लागणार आहे. विहिरींसाठी नमुना १२ मध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करताना त्यासोबत पाण्याच्या उपलब्धतेचे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे ना-हरकत प्रमाणपत्र, संबंधित खरेदीदाराने किमान प्रमाणभूत क्षेत्र धारण केलेले असावे, जिल्हाधिकारी विहिरीसाठी कमाल पाच गुंठ्यांपर्यंत (पाच आर) जमिनीच्या



हस्तांतरणाला मंजूरी देऊ शकतील. अशा जमिनींच्या विक्री खतानंतर विहिरीच्या वापरासाठी मर्यादित, असा शेरा सातबारा उताऱ्यावर इतर हक्कात नोंदविला जाणार आहे.

शेतरस्त्यासाठी अर्ज करताना सोबत शेतरस्त्याचा कच्चा नकाशा जोडावा लागेल. जिल्हाधिकारी अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित रस्त्याचा अहवाल तहसीलदारांकडून मागवतील, जिल्हाधिकारी शेतरस्त्यासाठी जमिनीचे हस्तांतरण करण्यास परवानगी देतील. या जमिनीच्या विक्री खतानंतर जवळच्या जमीनधारकांना वापरासाठी शेतरस्ता खुला राहील, अशी नोंद सातबारा उताऱ्यावर इतर हक्कात करण्यात येईल. सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीचे भूसंपादन झाल्यानंतर शिल्लक जमिनीच्या हस्तांतरणासाठी अर्ज करताना त्यासोबत भूसंपादनाच अंतीम निवाडा किंवा कमी-जास्त प्रमाणपत्र (कजाप) जोडावे लागेल. त्यानंतर जिल्हाधिकारी कागदपत्रांची पडताळणी करतील आणि हस्तांतरणाला मंजूरी देतील. ग्रामीण घरकूल लाभार्थ्यांसाठी अर्ज करताना जिल्हाधिकारी लाभार्थ्यांची अर्जदाराची ओळख पटविण्याची खात्री करतील. ग्रामीण घरकुलासाठी प्रत्येक लाभार्थ्याला एक हजार चौरस फुटांपर्यंत जमिनीचे हस्तांतरण करण्यास मंजुरी देतील.

विहीर, शेतरस्ता किंवा घरकुलाच्या लाभासाठी जमिनीच्या हस्तांतरणाला जिल्हाधिकारी हे एक वर्षासाठीच मंजूरी देतील किंवा अर्जदाराच्या विनंतीवरून पुढील दोन वर्षांसाठीच मुदतवाढ देता येणार आहे. ज्या कारणासाठी हस्तांतरणाची मंजूरी मिळाली, त्याच कारणासाठी जमिनीचा वापर करणे बंधनकारक आहे. अन्यथा मंजूरी रद्द करण्यात येणार आहे.

# पब, बारसह आता रेस्टॉरंटलाही रात्री दीडपर्यंत परवानगी

## रस्त्यावरील खाद्यपदार्थांचे स्टॉल रात्री साडेअकराला बंद : निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील पब, बिअर बारना रात्री दीड वाजेपर्यंतची वेळ यापूर्वीच ठरवून दिली आहे. परंतु आता रेस्टॉरंट, हॉटेल्स आणि आइस्क्रीम पार्लर यांनाही रात्री दीडपर्यंत परवानगी राहील. तर रस्त्यालगतच्या खाद्य पदार्थांच्या स्टॉल्सना रात्री साडेअकरानंतर बंद ठेवण्याचा आदेश पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.

देशी दारूच्या दुकानांना सकाळी आठ ते रात्री दहा वाजेपर्यंत वेळ आहे. त्यांनाही वेळेचे पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, दारूच्या दुकानाजवळ अंडाभुर्जी, चायनीज खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर मद्यपी दारू पितात. त्यामुळे अशा अंडाभुर्जी, चायनीज खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर कारवाई करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.





### ‘स्ट्रीट क्राईम’ रोखण्यास प्राधान्य

पुणे शहरात रस्त्यावर किरकोळ कारणावरून मारहाणीच्या घटना वाढत आहेत. यापुढे रस्त्यावरील गुन्हेगारी रोखण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. ‘स्ट्रीट क्राईम’ आणि वाहनांची तोडफोड करणाऱ्यांना यापुढे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला. सार्वजनिक ठिकाणी महिलांची छेडछाड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. महिलांच्या सुरक्षिततेबाबत निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

### निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कारवाई

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. संघटित गुन्हेगारी टोळ्यांतील गुन्हेगार, फरार आरोपी, बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारांची धरपकड सुरू आहे. शहरात नाकाबंदी आणि बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. घरफोडीच्या घटना रोखण्यासाठी कोंढवा, भारती विद्यापीठ, चतुःश्रृंगीसह सर्व पोलिस ठाण्यांच्या पोलिस निरीक्षकांना गस्त वाढविण्याच्या सूचना दिल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.